**<u>ठळक बातम्या</u>**

- मध्य आशियातल्या युद्धासंदर्भात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची फ्रान्स, ओमान, जॉर्डन, मलेशियाच्या नेत्यांशी चर्चा

- युद्धाचा फटका बसलेल्या निर्यातदारांसाठी केंद्र सरकारकडून पॅकेजची घोषणा, दोन आठवड्यात सव्वा लाख ग्राहकांची पाईप गॅसला पसंती

- इराणकडून अरब देशांच्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या साठ्यांवर तीव्र हल्ले

- शेअर बाजारात पावणे २ वर्षातली सर्वात मोठी घसरण, गेल्या ३ दिवसात झालेल्या तेजीपेक्षाही गुंतवणूकदारांचे अधिक नुकसान

**आणि**

- कार्यकाळ संपण्यापूर्वीच एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षांचा राजीनामा, बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्वाळा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्याशी आज दूरध्वनीवरून चर्चा केली. मध्य आशियातला संघर्ष तात्काळ थांबावा या मतावर दोन्ही नेत्यांनी या चर्चेत भर दिला. शांता आणि स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी सहकार्य करण्यासाठी दोन्ही देश तयार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमधे म्हटलं आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी आज ओमानचे सुलतान हैतम बिन तारिक, जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही दूरध्वनीवरून संवाद साधला. मध्य आशियात तातडीने शांतता प्रस्थापित करण्यासाठी संवाद सुरू करण्याची गरज दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली. मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याशीही प्रधानमंत्र्यांनी या विषयावर चर्चा केली.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं निर्यातदारांसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली आहे. १४ फेब्रुवारी ते १५ मार्च दरम्यान मध्यपूर्वेच्या मार्गाने निर्यात केलेल्या वस्तूंना सरकार कुठल्याही अतिरीक्त प्रीमियम शिवाय विमा संरक्षण देणार आहे. विमा संरक्षणासाठीचा अतिरीक्त प्रीमियम सरकार भरणार आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालक लव अग्रवाल यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.
निर्यातदारांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी विविध मंत्रालयांशी समन्वय साधण्याचे काम सुरू असल्याची माहिती वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिली.

**<><><><><>**

अवघ्या २ आठवड्यात सुमारे सव्वा लाख ग्राहकांना घरगुती आणि व्यावसायिक पीएनजी जोडणी दिली असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी दिली. नवी दिल्लीत त्या पत्रकार परिषदेला संबोधित करत होत्या. गेल्या तीन दिवसात साडेपाच हजारांपेक्षा जास्त ग्राहकांनी पीएनजीचा पर्याय निवडल्याचंही शर्मा यावेळी म्हणाल्या.

**होल्ड.. बाईट- सुजाता शर्मा**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या सेफसी विष्णू या जहाजावरून सुरक्षितपणे सुटका झालेले १५ भारतीय खलाशी लवकरच भारतात परततील. तसंच, या घटनेत ज्या भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला, त्याचं पार्थिवही भारतात परत आणण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या आखात विभागाचे सहसचिव असीम महाजन म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय बंदरं, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी आज मुंबईत बंदर आणि सागरी क्षेत्राच्या प्रतिनिधींबरोबर आढावा बैठक घेतली. पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या अडचणी, जहाज वाहतूक क्षेत्रावर याचा झालेला परिणाम यांसह इतर विषयांवर या बैठकीत चर्चा झाली. या संघर्षाच्या काळात भारताचा सागरी व्यापार सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं जलद पावलं उचलल्याचं प्रतिपादन सोनोवाल यांनी या बैठकीत केलं.

**<><><><><>**

इराणने शेजारी अरब राष्ट्रांच्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या साठ्यांवरचे हल्ले तीव्र केले आहेत. इस्त्रायलने केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने आज लाल समुद्रातील सौदी अरेबिया आणि कुवैतच्या तेल शुद्धीकरण कंपन्यांवर हल्ले केले. संयुक्त अरब अमिरातीच्या किनाऱ्यावर एका जहाजाला नष्ट करण्यात आलं तसंच कतारजवळही एका जहाजाचं नुकसान झालं. यामुळे मध्य आशियातला संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या दरात ११४ अमेरिकन डॉलर प्रती बॅरल इतकी वाढ झाली असून २८ फेब्रुवारीपासून कच्च्या तेलाचे दर ५७ टक्क्यांनी वाढले आहेत.

या युद्धामुळे इराणमधल्या तेराशे नागरिकांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे, तर लेबननमधले दहा लाखांहून अधिक नागरिक विस्थापित झाले आहेत. इस्त्रायलच्या पंधरा नागरिकांचा इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात मृत्यू झाला असून अमेरिकेचे तेरा लष्करी जवानही यात मृत्युमुखी पडले आहेत.

**<><><><><>**

मध्य आशियातल्या इंधन साठ्यांवर झालेल्या हल्ल्यामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्याची स्थिती अधिक गंभीर झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज सांगितलं. जलमार्गांवर युद्धाचा परिणाम झाल्याने

इंधनाचा प्रश्न अधिक बिकट झाला आहे. पश्चिम आशियातल्या या पेचावर तोडगा काढण्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न सुरु असल्याचं ते म्हणाले.

होर्मूसच्या सामुद्रधुनीत बावीस भारतीय जहाजं अडकली असून त्यावर ६११ खलाशी आहेत अशी माहिती त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल दिली. इराणमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी अनेक भारतीय विद्यार्थी आहेत. त्यांना मदत पोचवण्याचा आटोकाट प्रयत्न भारताकडून सुरु आहे अशी खात्री त्यांनी दिली. इराणमधल्या भारतीयांना परत आणण्यासाठी प्रयत्न सुरु असून त्यात लवकरच यश येईल असं त्यांनी सांगितलं.

चाबहार बंदर व्यवहारांवरच्या सशर्त निर्बंधांतून अमेरिकेने दिलेली सूट २६ एप्रिलपर्यंत लागू असल्याची माहितीही त्यांनी दिली. या बाबतीतल्या घडामोडींवर सरकार लक्ष ठेवून असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज झालेल्या जोरदार घसरणीमुळं गेल्या ३ दिवसात झालेल्या तेजीपेक्षाही गुंतवणूकदारांचे जास्त नुकसान झाले. सेन्सेक्स आज तब्बल २ हजार ४९७ अंकांनी कोसळून ७४ हजार २०७ अंकांवर बंद झाला. निफ्टी तब्बल ७७६ अंकांची घट नोंदवून २३ हजार २ अंकांवर बंद झाला. गेल्या पावणे २ वर्षातली शेअर बाजारातली ही सर्वात मोठी घसरण आहे. तेलाच्या वाढत्या किंमती, जागतिक पातळीवर कमजोर वातावरण, एचडीएफसीच्या अध्यक्षांनी दिलेला राजीनामा यामुळं या घसरणीत वाढ झाली.

**<><><><><>**

एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष अतनु चक्रवर्ती यांनी कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला आहे. बँकेत गेल्या २ वर्षात झालेल्या घडामोडी आणि कार्यपद्धती आपल्या व्यक्तिगत नीतीमूल्यांच्या विरोधात होत्या, असं कारण चक्रवर्ती यांनी दिलं आहे. त्यांचा कार्यकाळ मे २०२७मधे संपणार होता. चक्रवर्ती यांच्या

राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर माजी मुख्य कार्यकारी अधिकारी केकी मेस्त्री यांची तात्पुरती नेमणूक करायला रिझर्व बँकेनं मंजुरी दिली आहे.

एचडीएफसी बँक ही अतिशय महत्त्वाची बँक असून तीची वित्तीय परिस्थिती चांगली आहे, व्यावसायिक पद्धतीनं तिचं कामकाज सुरू आहे. नियमित तपासणीमध्ये बँकेच्या व्यवहारात काहीही चिंताजनक आढळून आलं नसल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

एचडीएफसी बँकेचे माजी अध्यक्ष अतनु चक्रवर्ती यांना राजीनामा मागे घ्यायला तसंच राजीनामा पत्राची भाषा बदलण्यास सांगण्यात आलं होतं असा खुलासा एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक शशीधर जगदिशन यांनी आज केला. संचालक मंडळाच्या प्रत्येक सदस्याने चक्रवर्ती यांना समजावण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी ऐकलं नाही असंही ते म्हणाले.  बँकेच्या कार्यपद्धतीत कोणतीही समस्या नसून बँक आपली विश्वासार्हता पुन्हा कमावेल असा विश्वास संचालक मंडळाने व्यक्त केला.

**<><><><><>**

बँक घोटाळा प्रकरणात सीबीआयनं आज नवी दिल्लीतल्या मुख्यालयात अनिल अंबानी यांची सुमारे ८ तास चौकशी केली. पुढील चौकशीसाठी उद्याही तपास अधिकाऱ्यासमोर उपस्थित राहण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले आहेत. या प्रकरणात रिलायन्स कम्युनिकेशन लिमिटेड आणि काही अज्ञात व्यक्तींवर देखील आरोप ठेवण्यात आलेले आहेत.

**<><><><><>**

पुद्दुचेरीसह चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध पक्षांनी उमेदवारी याद्या जाहीर केल्या असून उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात झाली आहे.

पश्चिम बंगाल निवडणुकीसाठी भाजपाने १११ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. माजी केंद्रीय मंत्री निशीत प्रामाणिक हे मठभंगा मतदारसंघातून तर माजी खासदार रुपा गांगुली सोनारपूर दक्षिण मतदारसंघातून निवडणूक लढवतील. माजी हॉकीपटू भारत छेत्री कलीमपोंग मतदारसंघातून मैदानात उतरले आहेत. तर नोमान राय दार्जिलिंगमधून निवडणूक लढवत आहेत.

भारतीय जनता पक्षाने आसाम विधानसभा निवडणुकीसाठी ८८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा जलुकबारी मतदारसंघातून निवडणूक लढवतील.

केरळमचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांनी धर्मदोम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. तमिळनाडूमधे आण्णा द्रमुक पक्ष विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके पक्षासोबत युती करणार असल्याची शक्यता आण्णा द्रमुकचे नेते के टी राजेंत्र बालाजी यांनी फेटाळून लावली.

गोव्यामधल्या पोंडा विधानसभा मतदारसंघासाठी आम आदमी पक्षाने गीतेश नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नाईक यांनी काल आपमधे प्रवेश केला.

**<><><><><>**

देशात आज ईदचा चंद्र न दिसल्यानं रमजान ईद शनिवारी साजरी केली जाणार आहे, अशी माहिती नवी दिल्लीतल्या जामा मशीदीच्या शाही इमामांनी दिली आहे.

**//<><><><><>//**